दूरध्वनी : २८४ १५ ७६ / २०२ ६२ ४९ फॅक्स : २०२ ९३ ४८
ग्राम : पाणीमंडळ, मुंबई

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१

**क्र.मजीप्रा/सस/सभा.९५/आ.४/११३७** **१२ मे, २००३**

**विषय :** दि.१२ मे, २००३ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९५ व्या सभेचे इतिवृत्त.

दि.१२ मे, २००३ रोजी सकाळी ११.३० वाजता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ९५ वी सभा संपन्न झाली. सदर सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सोबत सादर करण्यात येत आहे. कृपया सदर इतिवृत्तास मान्यता मिळावी ही विनंती.

**(दीपक भसाळे)**
**सदस्य सचिव**

**सचिव,**
**पा.पु.व स्व.विभाग**

**मा.मंत्री,**
**ग्रा.वि.,पा.पु.व स्व.**
**तथा अध्यक्ष, म.जी.प्रा.**

पुढील कार्यवाहीसाठी आ-४ कडे

आ-४

Sw.board.95min

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९५ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ९५ वी सभा मा.मंत्री, ग्रा.वि.पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.नामदार श्री.आर.आर.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दि.१२ मे, २००३ रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न झाली. या सभेस प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) श्री.आर.आर.पाटील, मा.मंत्री, ग्रा.वि., पा.पु.व स्व. तथा म.जी.प्रा.चे अध्यक्ष.
२) श्रीमती सुलेखाताई कुंभारे, मा.राज्यमंत्री, पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्षा.
३) श्री.सुनिल तटकरे, मा.राज्यमंत्री, नगर विकास, तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष
४) श्री.नवीनकुमार, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
५) श्री.बी.सी.खटुआ, सचिव, पा.पु. व स्व. विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
६) श्री.एस.एस.हुसेन, सचिव, ग्रा.वि.वि.तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
७) श्री.जयंतराव कावळे, सचिव, उर्जा तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
८) श्री.सुभाष लाला, सचिव (न.वि.२) तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई
९) श्री.दीपक भसाळे, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.

या व्यतिरिक्त सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते:-

१) श्री.अ.बा.सावंत, वि.स.व मु.ले.अ., म.जी.प्रा. नवी मुंबई.
२) श्री.आर.जी.होलानी, मुख्य अभियंता, म.जी.प्रा. नाशिक
३) श्री.व्ही.जी.पिंजरकर, कार्यवाह मुख्य अभियंता (को.वि.), म.जी.प्रा. ठाणे.
४) श्री.शेखर गायकवाड, मु.प्र.अ., म.जी.प्रा., मुंबई.
५) श्री.मिलिंद केळकर, विशेष कार्य अधिकारी, पा.पु.व स्व., मंत्रालय, मुंबई.
६) श्री.वेंकट कल्याणकर, अधीक्षक अभियंता (समन्वय), म.जी.प्रा., मुंबई.
७) श्री.एस.जी.तिवसकर, अधीक्षक अभियंता (यां), म.जी.प्रा., नवी मुंबई.

मा.मंत्री, ग्रा.वि.पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

## कार्यक्रम बाब क्र. १ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९४ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

म.जी.प्रा.च्या ९४ व्या सभेमध्ये ज्या कार्यक्रम बाबी सादर करण्यात आल्या होत्या त्यावर झालेल्या चर्चेनुसार जे इतिवृत्त तयार करण्यात आले आहे त्यातील मुद्यांचा आढावा घेण्यात आला. या इतिवृत्तावर सर्वसाधारणपणे चर्चा करण्यात येऊन खालील सूचना देण्यात आल्या,

अ) स्थानिक स्वराज्य संस्थांकडील थकबाकी वसुलीसाठी जी सवलतीची निर्भय योजना राबवावयाची आहे त्याबाबतची कार्यवाही सत्वर करण्यात यावी. याबाबतचा प्रस्ताव त्वरित शासनास सादर करुन सदर प्रस्तावास शासनाची मान्यता घेण्यात यावी. व निर्भय योजनेबाबत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना परिपत्रकाद्वारे अवगत करण्यात यावे.

ब ) मीरा-भाईंदर पाणी पुरवठा योजनेअंतर्गत कंत्राटदारास जो दंड परत करावयाचा आहे याबाबतच्या प्रस्तावावर सर्वसाधारणत: पुन्हा चर्चा करण्यात आली व दंड परत करण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. तथापि, या कामास भाववाढ देणे याबाबत सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि सचिव, पाटबंधारे विभाग यांच्याशी पुन्हा एकदा विचारविनिमय करुन भाववाढीच्या प्रस्तावाबाबतचा अंतिम निर्णय सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या स्तरावर घेण्यात यावा असे ठरविण्यात आले.

क) नागरी पा.पु.योजनांसाठी लागणा-या सी.आय. व डी.आय.पाईपचा पुरवठा त्वरित व्हावा यासाठी पुरवठादार कंपन्यांकडे पाठपुरावा करावा. या पाईप्ससाठी पुरवठादार कंपन्यांनी जी वाढ मागितलेली आहे त्याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी असे ठरले.

सध्या नुकत्याच संपलेल्या दर करारातील दराने (तात्पुरत्या स्वरुपात) पुरवठा करावा आणि नवीन दरकरार अस्तित्वात येण्यापूर्वी प्राधिकरणाने या पाईप्स पुरवठयासाठी खुल्या निविदा मागवाव्यात. त्यानुसार येणारे दर अथवा वर नमूद केलेली परंतु तपासणीनंतर येणारी ग्राहय वाढ किंवा डी.जी.एस.डी.च्या यापुढे होणा-या नवीन दरकरारातील दर यापैकी जे किमान दर असतील त्यानुसार आताच्या तात्पुरत्या पुरवठयाचे अंतिम दर ठरवून फरकाबाबत अदायगी करण्यात येईल. या अटीवर सध्या संपलेल्या दरकरारातील दरानुसार (तात्पुरते दर) पुरवठा घेण्याचे आणि या अटीस पुरवठादार / उत्पादक कंपन्यांची मान्यता घेऊनच पाईप्स पुरवठयाचे आदेश द्यावेत असे ठरले. तसेच, वरील वाढीचे समर्थन तपासणे व मजीप्रा स्तरावर पाईप्स पुरवठयांच्या निविदा मागविणे याबाबतची कार्यवाही तीन महिन्यात पूर्ण करुन दर निश्चित करण्यांत यावेत. मध्यंतरीच्या काळात, डी.जी.एस.डी.चा दरकरार झाल्यास सदर दराशी वरील दराशी तुलना करुन निर्णय घेण्यात यावा. तथापि, डी.जी.एस.डी.च्या दरकरारास विलंब लागणार असल्यास वर नमूद केलेली दरातील वाढ (समर्थनीय ठरणारी) व निविदेनुसार येणारे दर यापैकी जे दर कमी असतील त्या दराने उत्पादक कंपन्यांना देयके (तात्पुरते स्वरुपात) अदा करावीत आणि डी.जी.एस.डी.चे दरकरार जेव्हां अंतिम होतील तेव्हां त्यामधील दर वरील दरापेक्षा कमी असल्यास दरातील तफावतीनुसार उत्पादक कंपन्यांकडून वसुली करण्यात यावी असेही ठरले. तसेच पाईप्स पुरवठयाबाबतच्या निविदा दि. ९.६.२००३ पर्यंत प्राप्त होतील अशा पध्दतीने अत्यंत तातडीची बाब म्हणून निविदा कालावधी काही प्रमाणात कमी करणे इ. कार्यवाही करावी असाही निर्णय घेण्यात आला.

इतिवृत्तातील उर्वरित मुद्यांबाबत चर्चा करण्यात येऊन प्रस्तावित केल्यानुसार त्यास रीतसर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. २ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९४ व्या सभेतील निर्णयावर करण्यात आलेली कृती.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९४ व्या सभेच्या इतिवृत्तास या सभेमध्येच मान्यता दिल्यामुळे या कार्यक्रम बाबीबाबतची कार्यवाही पुढील बैठकीमध्ये सादर करावी असे निर्देशित करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ३ : सुधारित पाणी पुरवठा कार्यक्रम :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे तांत्रिक सेवा सल्लागार म्हणून करावयाची कामे व अंमलबजावणी कार्यपध्दती व त्यासाठी आकारावयाचे सेवाशुल्क.**

या प्रस्तावाबाबत सर्वकष चर्चा करण्यात येऊन पूर्ण ठेव तत्वावर हाती घ्यावयाच्या योजनांसाठी आकारावयाचे शुल्क याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या.

अ) ज्या योजनांना शासनाचे अनुदान दिले जाणार नाही, तसेच शासनाच्या हमीचीही आवश्यकता नाही अशा पूर्ण ठेव योजनांसाठी ई.टी.पी.चार्जेस कमी करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. याबाबतच्या खालील प्रस्तावित दरांना देखील मान्यता देण्यात आली..

| कामाची अंदाजित किंमत (कोटीमध्ये) | आकारावयाचे ई.टी.पी.चार्जेस | |
|---|---|---|
| | योजना पूर्ण करण्याचा कालावधी २ वर्षाच्या आंत | योजना पूर्ण करण्याचा कालावधी २ वर्षाच्यावर |
| १ कोटीपर्यंत | १७.५०% | १७.५०% |
| १ ते ५ कोटीपर्यंत | १६.००% | १६.५०% |
| ५ ते १० कोटीपर्यंत | १२.००% | १३.००% |
| १० ते २५ कोटीपर्यंत | १०.००% | ११.००% |
| २५ कोटीच्यावर | ८.००% | १०.००% |

ब) सल्लागार अभियंत्यांच्या तांत्रिक सेवेसाठी आकारावयाच्या दरांना मान्यता देण्यात आली.

क) ज्या नागरी पाणी पुरवठा योजना म.जी.प्रा.कडून राबविण्यात येत आहेत त्याबाबत आकारण्यात येणा-या ई.टी.पी.शुल्कामध्येही बदल करण्याचा प्रस्ताव सादर करावा असे सूचित करण्यात आले.

ड) पाणी पुरवठा योजनांशी निगडित असणारी धरणे/ बंधारे याप्रकारची कामे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून यापुढे पाटबंधारे विभागाकडे पूर्ण ठेव तत्वावर सोपविण्यात येऊ नयेत.

**कार्यक्रम बाब क्र. ४ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास परदेशातील/देशातील इतर राज्यात पाणी पुरवठा व मलनि:सारण व उपसा जलसिंचन योजनांची तांत्रिक सल्लागाराची कामे घेण्याच्या अनुषंगाने "प्रकल्प सल्लागार व व्यवस्थापन समिती" स्थापन करणेबाबत.**

परदेशातील/देशातील पाणी पुरवठा व मलनि:सारण तसेच उपसा जलसिंचन योजनांची तांत्रिक सल्लागाराची कामे म.जी.प्रा.ने घेण्याच्या अनुषंगाने सर्वकष चर्चा करण्यात येऊन या योजनांसाठी **"प्रकल्प सल्लागार व व्यवस्थापन समिती"** स्थापन करण्याच्या प्रस्तावास तसेच **प्रकल्प सल्लागार कक्ष व त्याची कार्यकक्षा** ठरविण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ५ : कर्जरोख्यासंबंधी करण्यात आलेले विविध करार व त्या अनुषंगाने शासन व प्राधिकरणावर येणा-या जबाबदा-या व बंधने.**

या कार्यक्रम बाबीद्वारे जी माहिती सादर करण्यात आलेली आहे त्याबाबतचे स्पष्टीकरण वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी केले. कर्जरोखे त्या अनुषंगाने करण्यात आलेले विविध करार व त्यामुळे शासन व प्राधिकरण यावर येणा-या जबाबदा-या व बंधने याबाबतची नोंद घेण्यात आली. तसेच या जबाबदा-या व बंधनांबाबत शासनास सत्वर अवगत करण्यात यावे असे सूचित करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ६ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये अंतर्गत करावयाच्या सरळसेवा भरतीच्या पदावरील नवीन नेमणूकांबाबत**

म.जी.प्रा.अंतर्गत करावयाच्या सरळ सेवा भरतीद्वारे महाराष्ट्र लोकसेवा आयोग माध्यमातून ज्या जागा भरण्यात येतील त्यांच्या वेतनाची निश्चिती कंत्राट पध्दतीने करणे ही बाब प्रस्तावामधून वगळण्यात यावी व ती सार्वजनिक बांधकाम विभाग व पाटबंधारे विभागाशी सुसंगत असावी. उर्वरित पदांची भरती कंत्राट पध्दतीने करण्यास व पुढील ३ वर्षाच्या कालावधीत ठोक वेतन देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. या प्रस्तावाच्या अनुषंगाने सादर करण्यात आलेले सर्व मुद्दे मान्य करण्यात आले.

अनुकंपा प्रतिक्षा यादीतील गट क व गट-ड संवर्गातील नेमणूकांसह सरळ सेवा भरतीच्या पदावरील नेमणुका कंत्राट पध्दतीने करण्यास व नेमणूकांपासून पुढील ३ वर्षासाठी ठोक वेतन देण्यास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ७ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या व अस्वीकृतीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या ४१ व्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले व या निर्णयाच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही सत्वर करावी असे निर्देशित करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ८ : वसई-विरार उप प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (सूर्या प्रकल्प उद्‌भव) बहाडोली येथील पुलाचे बांधकाम कोसळल्यामुळे सल्लागार मे.शहा टेक्नीकल कन्सल्टंट प्रायव्हेट लि., मुंबई यांचेवर कारवाई करणेबाबत.**

या प्रस्तावाबाबत सर्वकष चर्चा करण्यात येऊन ज्या सल्लागार कंपनीवर कारवाई करावयाची आहे त्या सल्लागार कंपनीचे बहाडोली पुलामधील त्रुटींबाबत अभिप्राय मागवून घ्यावेत व त्या अनुषंगाने सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता यांच्याशी सविस्तर चर्चा करुन विहित नियमानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत हा प्रस्ताव पुढील बैठकीमध्ये सादर करावा असे ठरविण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ९ : शहाड येथील प्रक्रियापूर्व पाण्याचे उदंचन केद्र व टेमघर येथील जलशुध्दीकरण केंद्रासह प्रक्रियोत्तर पाण्याच्या उदंचन केंद्राची वार्षिक देखभाल दुरुस्ती कंत्राटदाराच्या देयकातून वसुली परत करणेबाबत.**

या प्रस्तावाबाबत चर्चा करण्यात येऊन या कामाच्या निविदेमधील अटी व शर्ती यांच्या अधीन राहून सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याशी सर्वकष चर्चा करण्यात यावी व त्यांच्या सूचनेनुसार हा प्रस्ताव पुन्हा सादर करावा असे ठरविण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. १० : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला योजनांसाठी उपलब्ध निधीची कमतरता व त्यानुसार कामाच्या अंमलबजावणीचे नियोजन.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून राबविण्यात येणा-या योजनांसाठी उपलब्ध असणा-या निधीची माहिती वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी दिली. ज्या योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत त्या योजनांसाठी लागणारा निधी कमी पडत असल्याने तो कसा उभा करावयाचा याबाबत निर्णय घेण्यासाठी हा प्रस्ताव सादर केल्याचे स्पष्ट करण्यात आले. नागरी योजनांसाठी हुडकोचे कर्ज मंजुरीप्रमाणे निधी मिळाल्यास (आवश्यक पूर्ततेनंतर) निधीची विशेष अडचण रहाणार नाही असे सचिवांनी स्पष्ट केले. त्यामुळे, या प्रस्तावामधील माहितीचे अवलोकन करुन खालीलप्रमाणे सूचित करण्यात आले:-

१) जून, २००४ पर्यंत ज्या ग्रामीण योजना अन्य कर्ज योजनेत समाविष्ट नाहीत, त्या ग्रामीण पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी हुडको या वित्तीय संस्थेकडे प्रोग्रॅम लोन तत्वावर कर्जप्रस्ताव सादर करावा.

२) वरील प्रस्ताव वगळून ज्या ग्रामीण योजनांवर काम कमी झाले आहे (साधारणत: २५% पेक्षा कमी) अशा ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी नाबार्ड या वित्तीय संस्थेकडून कर्ज घेण्याचा प्रस्तावही वरीलप्रमाणे तयार करावा.

वरीलप्रमाणे प्रस्ताव शासनास सादर करुन शासन मंजुरीसाठी विभागास विनंती करावी असे ठरले.

यापुढे उपलब्ध निधी व त्या अनुषंगाने कामाचे नियोजन याबाबतची कार्यक्रम बाब विषय सूचीमध्ये अग्रक्रमाने घेण्यात यावी, जेणेकरुन या महत्वाच्या बाबीवर सर्वकष चर्चा होऊ शकेल.

**कार्यक्रम बाब क्र. ११ : म.जी.प्रा.मंडळ, रत्नागिरी अंतर्गत रत्नागिरी शहरातील मंडळ कार्यालयासाठी इमारत व अधीक्षक अभियंता यांचे निवासस्थानाच्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

या कामावर होणा-या वाढीव खर्चाची कारणे यावर चर्चा करण्यात येऊन या कामाचा रु.१,१८,५४,९५०/- किंमतीचा सुधारित प्रस्ताव मंजूर करण्यात आला. व या इमारतीचे बांधकाम प्राधान्याने पूर्ण करावे असे सूचित करण्यात आले. या कामासाठी कार्यालयीन इमारती या लेखा शिर्षाखाली तरतूद करणे व इमारतीच्या बांधकामावर खर्च करण्याबाबत सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

७

**आयत्यावेळची कार्यक्रम बाब क्र.१ :**

**पर्यटकांसाठी 'निवास व न्याहरी' योजनेमधील निवासस्थानांना घरगुती दराने पाणीपट्टी आकारणे बाबत आणि शासकीय व शासन मान्य शैक्षणिक संस्थेच्या स्वतंत्र नळ जोडणी असलेल्या वसतीगृहात घरगुती दराने पाणी पट्टी आकारणे बाबत.**

या प्रस्तावाच्या अनुषंगाने सर्वकष चर्चा करण्यात येऊन ' निवास व न्याहरी ' योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळाने मान्यता दिलेल्या म.जी.प्रा.च्या ग्राहकांना, तसेच शासकीय व शासन मान्य शैक्षणिक संस्थांच्या वसतीगृहांना स्वतंत्र नळ जोडणी असल्यास घरगुती ग्राहक संबोधून दि.१.४.२००३ पासून पाणीपट्टी आकारण्यास मान्यता देण्यात आली. याबाबतचे परिपत्रक म.जी.प्रा.ने सत्वर निर्गमित करावे असे ठरविण्यात आले.

उपरोक्त चर्चेनंतर मा.अध्यक्ष महोदयांनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे घोषित केले.

Sw.board.95min

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९५ व्यां सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ९५ वी सभा मा.मंत्री, ग्रा.वि.पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.नामदार श्री.आर.आर.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दि.१२ मे, २००३ रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न झाली. या सभेस प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) श्री.आर.आर.पाटील, मा.मंत्री, ग्रा.वि., पा.पु.व स्व. तथा म.जी.प्रा.चे अध्यक्ष.
२) श्रीमती सुलेखाताई कुंभारे, मा.राज्यमंत्री, पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्षा.
३) श्री.सुनिल तटकरे, मा.राज्यमंत्री, नगर विकास, तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष
४) श्री.नवीनकुमार, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
५) श्री.बी.सी.खटुआ, सचिव, पा.पु. व स्व. विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
६) श्री.एस.एस.हुसेन, सचिव, ग्रा.वि.वि.तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
७) श्री.जयंतराव कावळे, सचिव, उर्जा तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
८) श्री.सुभाष लाला, सचिव (न.वि.२) तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई
९) श्री.दीपक भसाळे, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.

या व्यतिरिक्त सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते:-

१) श्री.अ.बा.सावंत, वि.स.व मु.ले.अ., म.जी.प्रा. नवी मुंबई.
२) श्री.आर.जी.होलानी, मुख्य अभियंता, म.जी.प्रा. नाशिक
३) श्री.व्ही.जी.पिंजरकर, कार्यवाह मुख्य अभियंता (को.वि.), म.जी.प्रा. ठाणे.
४) श्री.शेखर गायकवाड, मु.प्र.अ., म.जी.प्रा., मुंबई.
५) श्री.मिलिंद केळकर, विशेष कार्य अधिकारी, पा.पु.व स्व., मंत्रालय, मुंबई.
६) श्री.वेंकट कल्याणकर, अधीक्षक अभियंता (समन्वय), म.जी.प्रा., मुंबई.
७) श्री.एस.जी.तिवसकर, अधीक्षक अभियंता (यां), म.जी.प्रा., नवी मुंबई.

मा.मंत्री, ग्रा.वि.पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र. १ :** **महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९४ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

म.जी.प्रा.च्या ९४ व्या सभेमध्ये ज्या कार्यक्रम बाबी सादर करण्यात आल्या होत्या त्यावर झालेल्या चर्चेनुसार जे इतिवृत्त तयार करण्यात आले आहे त्यातील मुद्यांचा आढावा घेण्यात आला. या इतिवृत्तावर सर्वसाधारणपणे चर्चा करण्यात येऊन खालील सूचना देण्यात आल्या,

अ) स्थानिक स्वराज्य संस्थांकडील थकबाकी वसुलीसाठी जी सवलतीची निर्भय योजना राबवावयाची आहे त्याबाबतची कार्यवाही सत्वर करण्यात यावी. याबाबतचा प्रस्ताव त्वरित शासनास सादर करुन सदर प्रस्तावास शासनाची मान्यता घेण्यात यावी. व निर्भय योजनेबाबत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना परिपत्रकाद्वारे अवगत करण्यात यावे.

ब ) मीरा-भाईंदर पाणी पुरवठा योजनेअंतर्गत कंत्राटदारास जो दंड परत करावयाचा आहे याबाबतच्या प्रस्तावावर सर्वसाधारणतः पुन्हा चर्चा करण्यात आली व दंड परत करण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. तथापि, या कामास भाववाढ देणे याबाबत सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि सचिव, पाटबंधारे विभाग यांच्याशी पुन्हा एकदा विचारविनिमय करुन भाववाढीच्या प्रस्तावाबाबतचा अंतिम निर्णय सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या स्तरावर घेण्यात यावा असे ठरविण्यात आले.

क) नागरी पा.पु.योजनांसाठी लागणा-या सी.आय. व डी.आय.पाईपचा पुरवठा त्वरित व्हावा यासाठी पुरवठादार कंपन्यांकडे पाठपुरावा करावा. या पाईप्ससाठी पुरवठादार कंपन्यांनी जी वाढ मागितलेली आहे त्याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी असे ठरले.

सध्या नुकत्याच संपलेल्या दर करारातील दराने (तात्पुरत्या स्वरुपात) पुरवठा करावा आणि नवीन दरकरार अस्तित्वात येण्यापूर्वी प्राधिकरणाने या पाईप्स पुरवठयासाठी खुल्या निविदा मागवाव्यात. त्यानुसार येणारे दर अथवा वर नमूद केलेली परंतु तपासणीनंतर येणारी ग्राहय वाढ किंवा डी.जी.एस.डी.च्या यापुढे होणा-या नवीन दरकरारातील दर यापैकी जे किमान दर असतील त्यानुसार आताच्या तात्पुरत्या पुरवठयाचे **अंतिम दर ठरवून फरकाबाबत अदायगी करण्यात येईल.** या अटीवर **सध्या** संपलेल्या दरकरारातील दरानुसार (तात्पुरते दर) पुरवठा घेण्याचे आणि या अटीस पुरवठादार / उत्पादक कंपन्यांची मान्यता घेऊनच पाईप्स पुरवठयाचे आदेश द्यावेत असे ठरले. तसेच, वरील वाढीचे समर्थन तपासणे व मजीप्रा स्तरावर पाईप्स पुरवठयांच्या निविदा मागविणे याबाबतची कार्यवाही तीन महिन्यात पूर्ण करुन दर निश्चित करण्यांत यावेत. मध्यंतरीच्या काळात, डी.जी.एस.डी.चा दरकरार झाल्यास सदर दराशी वरील दराशी तुलना करुन निर्णय घेण्यात यावा. तथापि, डी.जी.एस.डी.च्या दरकरारास विलंब लागणार असल्यास वर नमूद केलेली दरातील वाढ (समर्थनीय ठरणारी) व निविदेनुसार येणारे दर यापैकी जे दर कमी असतील त्या दराने उत्पादक कंपन्यांना देयके (तात्पुरते स्वरुपात) अदा करावीत आणि डी.जी.एस.डी.चे दरकरार जेव्हां अंतिम होतील तेव्हां त्यामधील दर वरील दरापेक्षा कमी असल्यास दरातील तफावतीनुसार उत्पादक कंपन्यांकडून वसुली करण्यात यावी असेही ठरले. तसेच पाईप्स पुरवठयाबाबतच्या निविदा दि. ९.६.२००३ पर्यंत प्राप्त होतील अशा पध्दतीने अत्यंत तातडीची बाब म्हणून निविदा कालावधी काही प्रमाणात कमी करणे इ. कार्यवाही करावी असाही निर्णय घेण्यात आला.

इतिवृत्तातील उर्वरित मुद्यांबाबत चर्चा करण्यात येऊन प्रस्तावित केल्यानुसार त्यास रीतसर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. २ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९४ व्या सभेतील निर्णयावर करण्यात आलेली कृती.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९४ व्या सभेच्या इतिवृत्तास या सभेमध्येच मान्यता दिल्यामुळे या कार्यक्रम बाबीबाबतची कार्यवाही पुढील बैठकीमध्ये सादर करावी असे निर्देशित करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ३ : सुधारित पाणी पुरवठा कार्यक्रम :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे तांत्रिक सेवा सल्लागार म्हणून करावयाची कामे व अंमलबजावणी कार्यपध्दती व त्यासाठी आकारावयाचे सेवाशुल्क.**

या प्रस्तावाबाबत सर्वंकष चर्चा करण्यात येऊन पूर्ण ठेव तत्वावर हाती घ्यावयाच्या योजनांसाठी आकारावयाचे शुल्क याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या.

अ) ज्या योजनांना शासनाचे अनुदान दिले जाणार नाही, तसेच शासनाच्या हमीचीही आवश्यकता नाही अशा पूर्ण ठेव योजनांसाठी ई.टी.पी.चार्जेस कमी करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. याबाबतच्या खालील प्रस्तावित दरांना देखील मान्यता देण्यात आली..

| कामाची अंदाजित किंमत (कोटीमध्ये) | आकारावयाचे ई.टी.पी.चार्जेस | |
|---|---|---|
| | योजना पूर्ण करण्याचा कालावधी २ वर्षाच्या आंत | योजना पूर्ण करण्याचा कालावधी २ वर्षाच्यावर |
| १ कोटीपर्यंत | १७.५०% | १७.५०% |
| १ ते ५ कोटीपर्यंत | १६.००% | १६.५०% |
| ५ ते १० कोटीपर्यंत | १२.००% | १३.००% |
| १० ते २५ कोटीपर्यंत | १०.००% | ११.००% |
| २५ कोटीच्यावर | ८.००% | १०.००% |

ब) सल्लागार अभियंत्यांच्या तांत्रिक सेवेसाठी आकारावयाच्या दरांना मान्यता देण्यात आली.

क) ज्या नागरी पाणी पुरवठा योजना म.जी.प्रा.कडून राबविण्यात येत आहेत त्याबाबत आकारण्यात येणा-या ई.टी.पी.शुल्कामध्येही बदल करण्याचा प्रस्ताव सादर करावा असे सूचित करण्यात आले.

ड) पाणी पुरवठा योजनांशी निगडित असणारी धरणे/ बंधारे याप्रकारची कामे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून यापुढे पाटबंधारे विभागाकडे पूर्ण ठेव तत्वावर सोपविण्यात येऊ नयेत.

**कार्यक्रम बाब क्र. ४ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास परदेशातील/देशातील इतर राज्यात पाणी पुरवठा व मलनि:सारण व उपसा जलसिंचन योजनांची तांत्रिक सल्लागाराची कामे घेण्याच्या अनुषंगाने "प्रकल्प सल्लागार व व्यवस्थापन समिती" स्थापन करणेबाबत.**

परदेशातील/देशातील पाणी पुरवठा व मलनि:सारण तसेच उपसा जलसिंचन योजनांची तांत्रिक सल्लागाराची कामे म.जी.प्रा.ने घेण्याच्या अनुषंगाने सर्वंकष चर्चा करण्यात येऊन या योजनांसाठी "प्रकल्प सल्लागार व व्यवस्थापन समिती" स्थापन करण्याच्या प्रस्तावास तसेच प्रकल्प सल्लागार कक्ष व त्याची कार्यकक्षा ठरविण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ५ : कर्जरोख्यासंबंधी करण्यात आलेले विविध करार व त्या अनुषंगाने शासन व प्राधिकरणावर येणा-या जबाबदा-या व बंधने.**

या कार्यक्रम बाबीद्वारे जी माहिती सादर करण्यात आलेली आहे त्याबाबतचे स्पष्टीकरण वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी केले. कर्जरोखे त्या अनुषंगाने करण्यात आलेले विविध करार व त्यामुळे शासन व प्राधिकरण यावर येणा-या जबाबदा-या व बंधने याबाबतची नोंद घेण्यात आली. तसेच या जबाबदा-या व बंधनांबाबत शासनास सत्वर अवगत करण्यात यावे असे सूचित करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ६ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये अंतर्गत करावयाच्या सरळसेवा भरतीच्या पदावरील नवीन नेमणूकांबाबत**

म.जी.प्रा.अंतर्गत करावयाच्या सरळ सेवा भरतीद्वारे महाराष्ट्र लोकसेवा आयोग माध्यमातून ज्या जागा भरण्यात येतील त्यांच्या वेतनाची निश्चिती कंत्राट पध्दतीने करणे ही बाब प्रस्तावामधून वगळण्यात यावी व ती सार्वजनिक बांधकाम विभाग व पाटबंधारे विभागाशी सुसंगत असावी. उर्वरित पदांची भरती कंत्राट पध्दतीने करण्यास व पुढील ३ वर्षाच्या कालावधीत ठोक वेतन देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. या **प्रस्तावाच्या अनुषंगाने सादर करण्यात आलेले सर्व मुद्दे मान्य करण्यात आले.**

अनुकंपा प्रतिक्षा यादीतील गट क व गट-ड संवर्गातील नेमणूकांसह सरळ सेवा भरतीच्या पदावरील नेमणुका कंत्राट पध्दतीने करण्यास व नेमणूकांपासून पुढील ३ वर्षासाठी ठोक वेतन देण्यास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ७ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या व अस्वीकृतीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या ४१ व्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले व या निर्णयाच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही सत्वर करावी असे निर्देशित करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ८ : वसई-विरार उप प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (सूर्या प्रकल्प उद्भव) बहाडोली येथील पुलाचे बांधकाम कोसळल्यामुळे सल्लागार मे.शहा टेक्नीकल कन्सल्टंट प्रायव्हेट लि., मुंबई यांचेवर कारवाई करणेबाबत.**

या प्रस्तावाबाबत सर्वकष चर्चा करण्यात येऊन ज्या सल्लागार कंपनीवर कारवाई करावयाची आहे त्या सल्लागार कंपनीचे बहाडोली पुलामधील त्रुटींबाबत अभिप्राय मागवून घ्यावेत व त्या अनुषंगाने सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता यांच्याशी सविस्तर चर्चा करुन विहित नियमानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत हा प्रस्ताव पुढील बैठकीमध्ये सादर करावा असे ठरविण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ९ :** शहाड येथील प्रक्रियापूर्व पाण्याचे उदंचन केद्र व टेमघर येथील जलशुध्दीकरण केंद्रासह प्रक्रियोत्तर पाण्याच्या उदंचन केंद्राची वार्षिक देखभाल दुरुस्ती कंत्राटदाराच्या देयकातून वसुली परत करणेबाबत.

या प्रस्तावाबाबत चर्चा करण्यात येऊन या कामाच्या निविदेमधील अटी व शर्ती यांच्या अधीन राहून सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याशी सर्वंकष चर्चा करण्यात यावी व त्यांच्या सूचनेनुसार हा प्रस्ताव पुन्हा सादर करावा असे ठरविण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. १० :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला योजनांसाठी उपलब्ध निधीची कमतरता व त्यानुसार कामाच्या अंमलबजावणीचे नियोजन.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून राबविण्यात येणा-या योजनांसाठी उपलब्ध असणा-या निधीची माहिती वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी दिली. ज्या योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत त्या योजनांसाठी लागणारा निधी कमी पडत असल्याने तो कसा उभा करावयाचा याबाबत निर्णय घेण्यासाठी हा प्रस्ताव सादर केल्याचे स्पष्ट करण्यात आले. नागरी योजनांसाठी हुडकोचे कर्ज मंजुरीप्रमाणे निधी मिळाल्यास (आवश्यक पूर्ततेनंतर) निधीची विशेष अडचण रहाणार नाही असे सचिवांनी स्पष्ट केले. त्यामुळे, या प्रस्तावामधील माहितीचे अवलोकन करुन खालीलप्रमाणे सूचित करण्यात आले:-

१) जून, २००४ पर्यंत ज्या ग्रामीण योजना अन्य कर्ज योजनेत समाविष्ट नाहीत, त्या ग्रामीण पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी हुडको या वित्तीय संस्थेकडे प्रोग्रॅम लोन तत्वावर कर्जप्रस्ताव सादर करावा.

२) वरील प्रस्ताव वगळून ज्या ग्रामीण योजनांवर काम कमी झाले आहे (साधारणत: २५% पेक्षा कमी) अशा ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी नाबार्ड या वित्तीय संस्थेकडून कर्ज घेण्याचा प्रस्तावही वरीलप्रमाणे तयार करावा.

वरीलप्रमाणे प्रस्ताव शासनास सादर करुन शासन मंजुरीसाठी विभागास विनंती करावी असे ठरले.

यापुढे उपलब्ध निधी व त्या अनुषंगाने कामाचे नियोजन याबाबतची कार्यक्रम बाब विषय सूचीमध्ये अग्रक्रमाने घेण्यात यावी, जेणेकरुन या महत्वाच्या बाबीवर सर्वंकष चर्चा होऊ शकेल.

**कार्यक्रम बाब क्र. ११ :** म.जी.प्रा.मंडळ, रत्नागिरी अंतर्गत रत्नागिरी शहरातील मंडळ कार्यालयासाठी इमारत व अधीक्षक अभियंता यांचे निवासस्थानाच्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

या कामावर होणा-या वाढीव खर्चाची कारणे यावर चर्चा करण्यात येऊन या कामाचा रु.१,१८,५४,९५०/- किंमतीचा सुधारित प्रस्ताव मंजूर करण्यात आला. व या इमारतीचे बांधकाम प्राधान्याने पूर्ण करावे असे सूचित करण्यात आले. या कामासाठी कार्यालयीन इमारती या लेखा शिर्षाखाली तरतूद करणे व इमारतीच्या बांधकामावर खर्च करण्याबाबत सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

(५१)

**आयत्यावेळची कार्यक्रम बाब क्र.१ :**

**पर्यटकांसाठी 'निवास व न्याहरी' योजनेमधील निवासस्थानांना घरगुती दराने पाणीपट्टी आकारणे बाबत आणि शासकीय व शासन मान्य शैक्षणिक संस्थेच्या स्वतंत्र नळ जोडणी असलेल्या वसतीगृहात घरगुती दराने पाणी पट्टी आकारणे बाबत.**

या प्रस्तावाच्या अनुषंगाने सर्वकष चर्चा करण्यात येऊन ' निवास व न्याहरी ' योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळाने मान्यता दिलेल्या म.जी.प्रा.च्या ग्राहकांना, तसेच शासकीय व शासन मान्य शैक्षणिक संस्थांच्या वसतीगृहांना स्वतंत्र नळ जोडणी असल्यास घरगुती ग्राहक संबोधून दि.१.४.२००३ पासून पाणीपट्टी आकारण्यास मान्यता देण्यात आली. याबाबतचे परिपत्रक म.जी.प्रा.ने सत्वर निर्गमित करावे असे ठरविण्यात आले.

उपरोक्त चर्चेनंतर मा.अध्यक्ष महोदयांनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे घोषित केले.

Sw.board.95min

**सदस्य सचिव**
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
मुंबई-२१.

**अध्यक्ष**
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
तथा मंत्री ग्रामविकास, पाणी पुरवठा
व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई-३२.